# राजगुरुनगर येथे गुणवंतांचा गौरव

राजगुरुनगर, ता. १२ : खेळाडूंनी कठोर मेहनत, जिद्द, परिश्रमाच्या बळावर स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव सेमारंभाप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभात गुणवंत विद्यार्थिनीला गौरविताना मान्यवर.

खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त वैष्णव ठाकूर(वेटलिफ्टिंग), आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक विजेती सारिका शिनगारे(वेटलिफ्टिंग), यांसह अक्षदा वाघ (सायकलिंग), ऐश्वर्या खळदकर (क्रॉसकंट्री), एकता वाळुंज (वेटलिफ्टिंग) या राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या खेळाडूंचा व विविध विभागात झळकलेल्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. तसेच या शैक्षणिक वर्षात पीएच. डी. प्राप्त व सेट परीक्षा उत्तीर्ण प्राध्यापकांचाही सन्मान करण्यात आला. शारीरिक शिक्षण संचालक प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, शारीरिक शिक्षण संचालक प्रतिमा लोणारी आदी उपस्थित होते.